दि.१६/०७/२०२६

# पोलीस उप आयुक्त, दक्षिण परिमंडळ ०२, मुंबई.

## प्रेस नोट

***

**'' दक्षिण परिमंडळ ०२ अधिनस्थ पोलीस ठाणेंनी हस्तगत केलेला एकुण ७३ लाख १८ हजार रूपये किंमतीचा मुद्देमाल परत केलेबाबत''**

दक्षिण परिमंडळ-२ अंतर्गत गुन्हयात चोरीस गेलेले आणि गहाळ मोबाईल शोधण्याची विशेष मोहिमेचे आयोजन करण्यात आले होते. सदर मोहिमेअंतर्गत लो.टी. मार्ग, पायधुनी, वि.प. मार्ग, डॉ.दा.भ. मार्ग, गांवदेवी, मलबार हिल पोलीस ठाणे तसेच दक्षिण परिमंडळ ०२ सायबर पथक यांनी वेगवेगळी पथके रवाना करून  मुंबई, महाराष्ट्र व इतर राज्यांतुन एकूण ३१७ गहाळ मोबाईल फोन शोधून हस्तगत केलेले असून त्यांची एकूण अंदाजित किंमत ₹४७,५५,०००/- इतकी आहे. तसेच लो.टी. मार्ग पोलीस ठाण्याने विविध गुन्ह्यांमध्ये जप्त केलेली खालील वर्णनाची मालमत्ता देखील मूळ मालकांना परत करण्यात आलेली आहे.

- रोख रक्कम ₹ ५,००,०००/-
- चांदी १ किलो १०७ ग्रॅम (अंदाजित किंमत ₹२,६०,०३४/-)
- सोने ११७ ग्रॅम (तीन सोन्याच्या चेन) (अंदाजित किंमत ₹१६,७९,७६९/-)
- सोने ९ ग्रॅम (सोन्याची चेन) (अंदाजित किंमत ₹१,२३,०००/-)

अशा प्रकारे एकूण ₹७३,१७,८०३/- ( त्र्याहत्तर लाख सतरा हजार आठशे तीन रूपये) किंमतीचा मुद्देमाल हा आज दि. १६/०७/२०२६ रोजी कार्यक्रम आयोजित करून तक्रारदारांना परत करण्यात आला आहे.

सदर मुद्देमाल हस्तगत करून परत करण्याची कार्यवाही ही मा.पोलीस आयुक्त, श्री.देवेन भारती, मा.पोलीस सह आयुक्त, श्री.मनोजकुमार शर्मा (कायदा व सुव्यवस्था), अप्पर पोलीस आयुक्त श्री.शैलेश बलकवडे (दक्षिण प्रादेशिक विभाग) यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस उप आयुक्त श्रीमती रागसुधा आर., दक्षिण परिमंडळ ०२, मुंबई यांनी आयोजित करून, सहाय्यक पोलीस आयुक्त, गिरगांव विभाग, गांवदेवी विभाग, पायधुनी विभाग, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, लो.टि. मार्ग पोलीस ठाणे, पायधुनी पोलीस ठाणे, वि.प.मार्ग पोलीस ठाणे, डॉ.दा.भ. मार्ग पोलीस ठाणे, गांवदेवी पोलीस ठाणे, मलबारहिल पोलीस ठाणे व दक्षिण परिमंडळ ०२, सायबर लॅबमधील अधिकारी आणि अंमलदार यांचे मार्फतीने  पार पडण्यात आलेली आहे.

***